## आवश्यक सूचना

१) माहिती पत्रकातील सर्व नियम मान्य असणाऱ्या विद्यार्थ्यांनीच महाविद्यालयात प्रवेश घ्यावा.

२) प्रत्येक विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्राच्या मूळ प्रती देतांना स्वत:जवळ त्या प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रति ठेवाव्यात.

३) महाविद्यालयाच्या परिसरात ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक आहे.

४) महाविद्यालयातील फर्निचर हे विद्यार्थ्यांसाठीच असल्याने त्याचा काळजीपूर्वक वापर करणे आवश्यक आहे. परंतु काही विद्यार्थी उगीचच नासधूस करताना आढळतात. जे विद्यार्थी फर्निचरची उगीचच नासधूस करताना आढळतील, त्यांना फर्निचरच्या किंमती एवढा दंड केल्या जाईल किंवा ज्या वर्गातील फर्निचरची नासधूस होईल. त्या वर्गाला फर्निचरच्या किंमती एवढा सामुहीक दंड केल्या जाईल.

५) शैक्षणिक शुल्काचा तक्ता माहिती पत्रकात देण्यात आला असला तरी शासकीय निर्णयानुसार त्यात या सत्रापासूनच बदल होण्याची शक्यता आहे. अशा नवीन बदलानुसार शैक्षणिक शुल्क आकारण्यात येईल.

६) महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांनी शिस्तीने पालन करणे आवश्यक आहे. बेशिस्त विद्यार्थ्यांवर योग्य ती कारवाई करण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.


प्रकाशक

***डॉ. दिनेश वामनराव निचित***

प्राचार्य

संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

वलगांव, जि, अमरावती.


स्व. बाबासाहेब वऱ्हाडे शिक्षण संस्था, अमरावती

द्वारा संचालित

# संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वलगांव.

जि. अमरावती (महाराष्ट्र)

**“NAAC Accredited C Grade”**


(कार्यालय : (0721) 2386276, निवास : (0721) 2530943


# माहिती पत्रक

## २०२०-२०२१

मूल्य - रू.२०

## परिशिष्ट अ
## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

## विद्यार्थ्यांच्या माहिती व मार्गदर्शनाकरिता सूचना

महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतांना विद्यापीठाचे अध्यादेश नियम व परिनियम सर्व दुरूस्त्यासह माहिती करून घेणे आवश्यक आहे. विशेषत: खालील अध्यादेशातील तरतूदी नीट समजावून घेणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| अध्यादेश क्र.१ | विद्यार्थ्यांच्या नामांकनासंबंधी |
| अध्यादेश क्र.२ | विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत. |
| अध्यादेश क्र.४ | राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये सहभागी होण्याबाबत. |
| अध्यादेश क्र.५ | विद्यार्थ्यांचे शारिरीक स्वास्थ कल्याण. |
| अध्यादेश क्र.१० | सुट सवलत आणि पुढील वर्गात प्रवेश मिळणेबाबत. |
| अध्यादेश क्र.१२ | विद्यापीठ शुल्कासंबंधी माहिती. |
| अध्यादेश क्र.१९ | पदवीकरिता विद्यार्थ्यांचा प्रवेश |
| अध्यादेश क्र.१०९ | विद्यापीठाच्या दस्ताऐवजामध्ये नावं बदलविण्यासंबंधी |
| अध्यादेश क्र. १/८५ | प्रोत्साहनात्मक गुणासंबंधी |

**कुलसचिव**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ**

## सार्वजनिक सुट्या : २०२०-२०२१

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने प्राध्यापक व विद्यार्थ्यांकरिता सार्वजनिक सुट्या आणि अध्ययन काळ खालीलप्रमाणे जाहीर केले आहेत.

| अ.क्र. | सण | दिवस व दिनांक |
|---|---|---|
| १. | स्वातंत्र्य दिन | शनिवार, दि. १५ ऑग., २०२० |
| २. | गणेश चतुर्थी | शनिवार, दि. २२ ऑग., २०२० |
| ३. | गौरी पूजन | बुधवार, दि. २६ ऑग., २०२०. |
| ४. | अनंत चतुर्दशी | मंगळवार, दि. १ सप्टेंबर, २०२० |
| ५. | सर्वपित्री अमावास्या | गुरूवार, दि. १७ सप्टेंबर, २०२० |
| ६. | महात्मा गांधी जयंती | शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर, २०२० |
| ७. | इद-ए-मिलाद | शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर,२०२० |
| ८. | गुरूनानक जयंती | सोमवार, दि. ३० नोव्हेंबर, २०२०. |
| ९. | ख्रिसमस | शुक्रवार, दि. २५ डिसेंबर, २०२० |
| १० | प्रजासत्ताक दिन | मंगळवार, दि. २६ जानेवारी, २०२१ |
| १०. | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | शुक्रवार, दि. १९ फेब्रुवारी, २०२१ |
| १०. | महाशिवरात्री | गुरूवार दि, ११ मार्च,२०२१ |
| १२. | होळी (दुसरा दिवस) | सोमवार, दि. २९ मार्च, २०२१ |
| १५. | गुड फ्रायडे | शुक्रवार, दि. २ एप्रिल, २०२१ |
| १३. | गुढीपाडवा | मंगळवार, दि.१३ एप्रिल, २०२१ |
| १६. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | बुधवार, दि. १४ एप्रिल, २०२१ |
| १७. | महाराष्ट्र दिन | शनिवार, दि. १ मे, २०२१ |
| १८. | रमझान ईद | गुरूवार, दि. १३ मे, २०२१ |
| १९. | बुद्ध पौर्णिमा | बुधवार, दि. २६ मे, २०२१ |

### ⌘ अध्ययन काळ ⌘

| अ.क्र. | दीर्घ सत्र | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १. | प्रथम सत्र | - मंगळवार दि. ४ ऑग. २०२० ते | शनि. दि. २६ डिसे.२०२० |
| २. | हिवाळी दीर्घ सुटी | -सोम. दि. ९ नोव्हें. २०२० ते | शनि . २१ नोव्हें.२०२० |
| ३. | द्वितीय सत्र | - सोम. दि.११ जाने.२०२१ ते | शनि. दि. २९ मे, २०२१ |
| ४. | उन्हाळी दीर्घ सुटी | -सोम.दि.३१ मे २०२१ ते | रवि. दि. ४ जुलै २०२१ |

आमची प्रेरणा ! आमची स्फुर्ती !! आमचा आदर्श !!

निष्काम कर्मयोगी वैराग्यमुर्ती

# वंदनीय संत गाडगे बाबा



## संत गाडगेबाबांचा क्रांतीकारी समाजशील दशसुत्री संदेश

| | | |
|---|---|---|
| भुकेलेल्यांना | – | अन्न |
| तहानलेल्यांना | – | पाणी |
| उघड्यानागड्यांना | – | वस्त्र |
| गरीब मुलांमुलींना | – | शिक्षणासाठी मदत |
| बेघरांना | – | आसरा |
| अंध, पंगु, रोग्यांना | – | औषधोपचार |
| बेकारांना | – | रोजगार |
| पशु,पक्षी,मुक्या प्राण्यांना | – | अभय |
| गरीब तरूण तरूणींचे | – | लग्न |
| दु:खी व निराशांना | – | हिंमत |



## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



## ।। विद्यापीठ गीत ।।

विद्या चिंतन । विद्या मंथन ।
विद्या सर्जन । विद्या जीवन ।।

जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले
संत गाडगे बाबा तुमचे स्वप्न पुर्ण झाले ।।
कुणी न आता खुळे अडाणी, ज्ञानासह विज्ञान कळाले
पर्णकुटीतील प्रतिभेलाही, आभाळाचे पंख मिळाले
दशसूत्राचे अक्षर अक्षर, वेद नवा बोले ।।१ जनमन...

किती रंजले, किती गांजले, किती आंधळे लुळे पांगळे
कर्मयोग निष्काम आचरून, कवेत घेता बांधव सगळे
भूतदयेच्या ओल्याव्याने, मानस मोहरले ।।२ जनमन...

धर्मजातीच्या पलिकडेही माणूस केवळ माणूस असतो
भेदभ्रमांचे बंध तोडूनी मानवतेचे पूजन करतो
पिढ्यापिढ्यांचे जीवन दर्शन विश्वात्मक झाले ।।३
जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले ।।

– प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | स्व.डि.एन.पाटील स्मृती पारितोषिक | स्व.डि.एन.पाटील यांचे स्मृती प्रित्यर्थ डॉ.सौ.माधुरी भटकर यांचे तर्फे बी.ए.भाग १ मराठी वाङ्मय ह्या विषयात प्रथम येणाऱ्यास हे पारितोषिक देण्यात येते. | २५१/- |
| १३. | स्व.विनोद कोहळे स्मृती पारितोषिक | स्व.विनोद कोहळे यांचे स्मृती प्रित्यर्थ बी.ए.भाग ३ इंग्रजी ह्या विषयात सर्वाधिक गुण घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास डॉ.मनिषा कोहळे यांच्याकडून हे पारितोषिक देण्यात येते. | २००/- |
| १४. | उत्कृष्ट वाचक पुरस्कार | महाविद्यालयातील जो विद्यार्थी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त पुस्तके वाचन करेल अशा विद्यार्थ्यास डॉ.संजय वाघ, ग्रंथपाल यांचे मार्फत हा पुरस्कार देण्यात येतो. | २२१/- |
| १५. | उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार | महाविद्यालयातील सर्वोतकृष्ट खेळाडूला प्रा.वसंत ठाकरे यांच्या मार्फत हा पुरस्कार देण्यात येतो. | २०१/- |



# ● आमचे श्रध्दास्थान ●

-- संस्थापक अध्यक्ष --

**परमपुज्य**

**स्व.डॉ.अनिल उपाख्य भाऊसाहेब वऱ्हाडे**



# विद्यापीठाचा पर्यावरण पुरस्कार



**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने पर्यावरण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्थेला पर्यावरण पुरस्कार देवून गौरवविल्या जाते सन २०११ ला हा पुरस्कार तत्कालीन कुलगुरू डॉ. मोहन खेडकर यांच्या शुभ हस्ते संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वलगांव ला देण्यात आला. संस्था अध्यक्ष डॉ. आकाश वऱ्हाडे यांनी हा पुरस्कार स्विकारला.**



| | | | |
|---|---|---|---|
| ६. | स्व.पांडूरंगजी काळे स्मृती पारितोषिक | स्व.पांडूरंगजी काळे यांचे स्मृती प्रित्यर्थ डॉ. संजय काळे यांचे मार्फत बी.कॉम. भाग १ मधून लेखाकर्म या विषयात प्रथम येणाऱ्यास हे पारितोषिक देण्यात येते. | २११/- |
| ७. | स्व.रोडबाजी चव्हाण स्मृती पारितोषिक | स्व.रोडबाजी चव्हाण यांचे स्मृती प्रित्यर्थ डॉ.शंकर चव्हाण यांचे मार्फत बी.कॉम. भाग २ मधून अर्थशास्त्र या विषयात प्रथम येणाऱ्यास हे पारितोषिक देण्यात येते. | २११/- |
| ८. | स्व. श्रीकृष्णराव केदार स्मृती पारितोषिक | स्व.श्रीकृष्णराव केदार यांचे स्मृती प्रित्यर्थ डॉ. सुनिल केदार यांचे मार्फत बी.कॉम. भाग ३ मधून संगणक विषयात प्रथम येणाऱ्यास हे पारितोषिक देण्यात येते. | २११/- |
| ९. | स्व.वामनराव भि. निचित स्मृती पारितोषिक | स्व.वामनराव भि. निचित यांचे स्मृती प्रित्यर्थ डॉ. दिनेश वा. निचित यांचे तर्फे बी.कॉम. भाग १ मधून व्यवसाय प्रबंधन ह्या विषयात प्रथम येणाऱ्यास हे पारितोषिक देण्यात येते. | २११/- |
| १० | स्व. माणिकराव खोरगडे स्मृती पारितोषिक | स्व. माणिकराव खोरगडे यांचे स्मृती प्रित्यर्थ प्रा.सौ.प्रिया एस.खोरगडे यांचे तर्फे बी.ए.भाग १ मधून गृहअर्थशास्त्र ह्या विषयात प्रथम येणाऱ्यास हे पारितोषिक देण्यात येते. | २५१/- |
| ११. | स्व.वत्सलाबाई बा. गजभे स्मृती पारितोषिक | स्व. वत्सलाबाई बा. गजभे यांचे स्मृती प्रित्यर्थ प्रा.हरीभाऊ गजभे यांचे तर्फे बी.ए.भाग १ मराठी व बी.कॉम. भाग १ मराठी ह्या विषयात प्रथम येणाऱ्यास हे पारितोषिक देण्यात येते. | २५१/- |

## - शिष्यवृतीचे विवरण -

| अ.क्र. | शिष्यवृत्ती /पारितोषिकाचे नाव | शिष्यवृत्ती/ पारितोषिकांचे स्वरूप | शिष्यवृत्तीची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | स्व.डॉ.भाऊसाहेब वऱ्हाडे स्मृती पारितोषिक | स्व.डॉ.भाऊसाहेब वऱ्हाडे स्मृती प्रित्यर्थ डॉ. आकाशभाऊ वऱ्हाडे यांचे मार्फत बी.ए. भाग ३/बी.कॉम. भाग ३ या दोन्ही वर्गातून प्रथम श्रेणीत प्रथम येणाऱ्यास हे पारितोषिक देण्यात येईल. | २५१/- |
| २. | स्व. मिनाक्षी दंदे स्मृती पारितोषिक | स्व. मिनाक्षी दंदे यांचे स्मृती प्रित्यर्थ डॉ. अरविंद जोशी यांचे मार्फत हे पारितोषिक बी.ए.भाग १ मधून समाजशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्यास देण्यात येते. | २५१/- |
| ३. | स्व.रामरावजी यावले स्मृती पारितोषिक | स्व.रामरावजी यावले यांचे स्मृती प्रित्यर्थ डॉ. ज्ञानेश्वर यावले यांचे मार्फत बी.ए.भाग १ मधून राज्यशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्यास देण्यात येते. | २५१/- |
| ४. | स्व.नानासाहेब जवंजाळ स्मृती पारितोषिक | स्व.नानासाहेब जवंजाळ यांचे स्मृती प्रित्यर्थ डॉ. प्रकाश जवंजाळ यांचे मार्फत बी.ए.भाग १ मधून अर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्यास हे पारितोषिक देण्यात येते. | २००/- |
| ५. | स्व.निळकंठराव बनकर स्मृती पारितोषिक | स्व. निळकंठराव बनकर यांचे स्मृतीप्रित्यर्थ प्रा.पुष्पा बनकर यांचे मार्फत बी.ए. भाग १ मधून इतिहास विषयात प्रथम येणाऱ्यास हे पारितोषिक देण्यात येते. | २००/- |



# स्व. बाबासाहेब वऱ्हाडे शिक्षण संस्था, अमरावती.

## कार्यकारी परिषद

| | |
|---|---|
| १) डॉ.आकाश अनिल वऱ्हाडे | अध्यक्ष |
| २) श्री.सुनिल गोपाळराव वऱ्हाडे | उपाध्यक्ष |
| ३) श्री.सुनिल श्रीधरराव जवादे | उपाध्यक्ष |
| ४) श्री.विजयकुमार भगवानदास गुप्ता | सचिव |
| ५) डॉ.श्रीमती अनुराधा अनिल वऱ्हाडे | कोषाध्यक्ष |
| ६) डॉ.सौ. सारिका आकाश वऱ्हाडे | सहसचिव |
| ७) श्री.प्रकाश भिमराव चौधरी | सल्लागार |
| ८) श्री.रामदास गंगारामजी सोनोने | संघटक |
| ९) डॉ. मोरेश्वर माधवराव पाटील | सदस्य |
| १०) श्री.ॲड सुनिल विठ्ठलराव पुंड | सदस्य |
| ११) सौ. निताताई विजयकुमार गुप्ता | सदस्य |
| १२) श्री.अमोल मनोहरराव पाटील | सदस्य |
| १३) श्री. जितेंद्र विष्णुपंत घारड | सदस्य |

# संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वलगांव

## महाविद्यालय विकास समिती

| | |
|---|---|
| १) डॉ. आकाश अनिल वऱ्हाडे | अध्यक्ष |
| २) श्री. विजयकुमार गुप्ता | सदस्य |
| ३) डॉ. अनुराधाताई अनिल वऱ्हाडे | सदस्य |
| ४) श्री. बाबा कोंडलवार | सदस्य |
| ५) श्री. विनोद मेहकरे | सदस्य |
| ६) डॉ. संजय काळे | सदस्य |
| ७) डॉ. प्रकाश जवंजाळ | सदस्य |
| ६) प्रा. वसंत ठाकरे | सदस्य |
| ९) डॉ. माधुरी भटकर | सदस्य |
| १०) श्री. संजय वाघ | सदस्य |
| ११) श्री. राहुल तायडे | सदस्य |
| १२) श्री. नरेंद्र लांडे | सदस्य |
| १३) | |
| १४) डॉ. दिनेश वा. निचित | सचिव |



# संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वलगांव.

## - शिष्यवृत्ती व पारितोषिक योजना -

संत गाडगे महाराज महाविद्यालय, वलगांव हे एक ग्रामीण भागातील महाविद्यालय आहे. महाविद्यालयात आजूबाजूच्या परिसरातील गरीब व मागासवर्गीय विद्यार्थी बहुसंख्येने प्रवेश घेतात. बहुतेक विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असते अनेक विद्यार्थी मोलमजूरी करून शिक्षण घेतात. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात नियमित यावे तसेच त्यांना अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळावे या दृष्टीकोनातूनच ही योजना २००५ पासून स्व. डॉ.भाऊसाहेब वऱ्हाडे यांच्या प्रेरणेने सुरू करण्यात आली.

**योजनेची उद्दिष्टचे :**

१. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये नियमित हजर रहावे.

२. विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळावे.

३. विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी आवड व अभिरूची निर्माण व्हावी.

४. विषयांचा निकाल वाढावा व त्यातूनच महाविद्यालयाच्या निकालामध्ये वाढ व्हावी.

५. मान्यवरांच्या स्मृतींना उजाळा मिळावा.

**वार्षिकांक :**

महाविद्यालयातर्फे दरवर्षी वार्षिकांक प्रसिद्ध केल्या जातो. विद्यार्थ्यांचे लिखाण, वाङ्मयीन विचार यांचे प्रतिबिंब या अंकात पहायला मिळते.

**पालकसभा :**

पालक हा महाविद्यालयाशी संबंधित महत्त्वपूर्ण घटक आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत किंवा त्यांच्या वर्तणुकीबाबत माहिती देण्याकरिता तसेच आवश्यक त्या उपाययोजना राबविण्याकरिता पालकांची मते जाणून घेण्याकरिता पालकसभा घेण्यात येतील. या सभांना पालकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) :**

महाविद्यालयात सत्र १९९३-९४ पासून रा.से.यो. चे युनिट मिळालेले आहे. यामध्ये मर्यादीत विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्यामध्ये ८०% उपस्थिती आवश्यक आहे. त्याशिवाय प्रोत्साहनपर गुण मिळणार नाही.

**महाविद्यालयातील दिनदर्शिका सत्र २०२०-२१ :**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार या सत्रासाठी अध्ययन काळ व सुट्या राहतील. या सत्रासाठी महाविद्यालयाची सुरूवात सोमवार दि. ०४/०८/२०२० रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.

**- प्रवेश समिती-**

**प्राचार्य डॉ. दिनेश डब्ल्यू. निचीत (अध्यक्ष)**
**डॉ. सुनिल एस. केदार, प्रा. वसंत बी. ठाकरे,**
**प्रा.पी.एस.खोरगडे**
**श्री. राजनारायण ल. रायकवार**



# संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वलगांव.

**डॉ. दिनेश वामनराव निचित**
एम. कॉम., एम.फील.,
बी.एड., पीएच्. डी.
**प्राचार्य**

## प्राध्यापक वृंद

**कला विभाग :**

१) **डॉ.पी.यु.जवंजाळ**
एम.ए.(अर्थ.), एम.ए. (राज्य), एम.फील.,बी.एड., पीएच्.डी.

२) **डॉ.ए.व्ही.जोशी**
एम.ए.(समाज.), एम.एस. डब्ल्यू, एम.फील., पीएच्.डी.

३) **डॉ.एम.व्ही.कोहळे (इसापुरे)**
एम.ए.(इंग्रजी), पीएच्.डी.

४) **प्रा.कु.पी.एन.बनकर**
एम.ए.(इतिहास)

५) **प्रा.एच.बी.गजभे**
एम.ए.(मराठी)

६) **डॉ.एम.व्ही.भटकर**
एम.ए.(मराठी), पीएच्.डी.

७) **प्रा. पी.एस. खोरगडे**
एम.ए., बी.एड्.(गृह अर्थशास्त्र)

**वाणिज्य विभाग :**

१) **डॉ.एस.पी.काळे**

एम.कॉम.,बी.एड.,एम.फील., पीएच्.डी.

२) **डॉ.एस.आर.चव्हाण**

एम.ए.(अर्थ.), एम.कॉम.,बी.एड.,एम.फील., पीएच्.डी.

३) **डॉ. एस.एस.केदार**

एम.कॉम.,एम.फील., पीएच्.डी.

**शारीरिक शिक्षण विभाग :**

**प्रा. व्ही.बी. ठाकरे** , एम.पी.एड. (शारीरिक शिक्षण संचालक)

**ग्रंथालय विभाग :**

**डॉ.एस.एन.वाघ (ग्रंथपाल)** एम.एल.आय.एस्सी., पीएच्.डी.

**वैद्यकीय अधिकारी :**

१) **डॉ.सौ.सारिका वऱ्हाडे,** एम.बी.बी.एस., डी.जी.ओ.

२) **डॉ.राजीव रोडे,** डी.एच.एस.एस.

३) **डॉ.सौ.ज्योती रोडे,** बी.ए.एम.एस.

**कार्यालय विभाग :**

१) **श्री. नरेंद्र वा. लांडे,** बी.ए. (मुख्य लिपिक)

२) **श्री. सुधीर वि.कांबे,** बी.ए. (वरिष्ठ लिपिक)

३) **श्री. राजनारायण ल. रायकवार,** बी.ए. (कनिष्ठ लिपिक)

४) **कु.मिना शं. निर्मळ,** (चतुर्थ श्रेणी कर्मचारी)

५) **श्री. शंकर तु. मालवे,** (चतुर्थ श्रेणी कर्मचारी)

६) **श्री. सुरेंद्र जानरावजी राऊत** , (चतुर्थ श्रेणी कर्मचारी)

७) **श्री. महेंद्र श्रीनाथजी हिरडे,** (ग्रंथालय परिचर)



**ड्रेस कोड :**

या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी दररोज कॉलेज ड्रेस घालून महाविद्यालयात उपस्थित राहावे. आणि तसेच कॉलेज ड्रेस शिवाय महाविद्यालयाच्या आवारात प्रवेश मिळणार नाही.

**शारीरिक शिक्षण :**

१) महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

२) विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांला शारीरिक क्षमता चाचणी उत्तीण होणे आवश्यक आहे. अन्यथा नियमानुसार दंड होऊ शकतो.

३) प्राविण्य प्राप्त खेळाडूकरिता १०% जागा प्रवेशाचे आरक्षण राहील.

**वैद्यकीय तपासणी :**

विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा वैद्यकीय चाचणी घेतली जाईल. चाचणी आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांला ही चाचणी चुकविता येणार नाही. या चाचणीत उपस्थित न झाल्यास रू. २५ दंड आकारण्यात येईल.

**वैद्यकीय परीक्षा :**

विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांला वैद्यकीय चाचणी परिक्षेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. अनुपस्थित राहिल्यास २५ रू. दंड पडेल.

**ग्रंथालय :**

ग्रंथालयाची इमारत स्वतंत्र असून सर्व ग्रंथांनी परिपूर्ण आहे.महाविद्यालयाचे ग्रंथालयात अभ्यासाची पुस्तके, संदर्भ ग्रंथ, दैनिके उपलब्ध आहेत. ओळखपत्राशिवाय ग्रंथालयात प्रवेश नाकारला जाईल. महाविद्यालयाची सर्व पुस्तके वार्षिक परिक्षेचे प्रवेशपत्र घेण्यापूर्वी परत करावी लागतील. यानंतर पुस्तके लागल्यास पुस्तकांची पूर्ण किंमत अनामत रक्कम म्हणून ठेवून पुस्तके मिळू शकतील. या संबंधीचे निर्णय प्राचार्याचे आदेशानुसार ग्रंथपालावर अवलंबून राहील. ग्रंथालयात प्रवेश पावती सादर करून पुस्तके घेण्यासाठी बी.टी. घ्यावी.

## आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत (इ.बी.सी. कन्सेशन)

अ) ज्या विद्यार्थ्यांचे आई-वडील, पालक यांचे वार्षिक उत्पन्न १,००,००० रू. किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांनी आर्थिकदृष्ट्या मागासवर्गासाठी पुरस्कृत करण्यात आलेल्या फी सवलतीचा फॉर्म योग्य माहितीसह भरून व त्यासोबत तहसिलदार यांच्याकडून उत्पन्नाचा दाखला प्राप्त करून तो आवेदनपत्रास जोडावा. आई-वडील हयात नसल्यास तसा दाखला सादर करावा लागेल. अन्यथा फी सवलत नाकारल्या जाईल.

ब) शिक्षणात खंड पडत असल्यास दाखला (गॅप सर्टिफिकेट) सादर करावे लागेल अन्यथा फी सवलत नाकारल्या जाईल.

क) ज्या सरकारी किंवा स्थानिक स्वराज्य कर्मचाऱ्यांचे मूळ पगाराचे वार्षिक उत्पन्न १,००,००० रू चे आत आहे. अशांच्या मुलांना फी सवलत मिळेल.

ड) प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना फी माफीची सवलत मिळते.

### शिस्त :

महाविद्यालयाने संमत केलेल्या नियमांचे पालन करून प्रत्येक विद्यार्थ्याने शिस्तीने वागणे अनिवार्य आहे. महाविद्यालयात व महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांने आपली वागणूक उत्कृष्ट ठेवावी.

### ओळखपत्र :

या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे. रू.३० व पासपोर्ट आकाराचा फोटो कार्यालयात देऊन विद्यार्थ्यांना ओळखपत्र मिळवता येईल. महाविद्यालयात असताना ते सतत सोबत ठेवावे लागेल.



# संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वलगांव.

(संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न)

## माहिती पत्रक : २०२०-२०२१

**स्थापनाचा उद्देश :**

भारत एक ग्रामप्रधान राष्ट्र असल्याने शिक्षण क्षेत्रात ग्रामीण भागातील विद्यार्थी उच्च शिक्षणापासून उपेक्षित राहू नये, ह्या दृष्टीने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. डॉ. अनिल वऱ्हाडे यांनी स्व. बाबासाहेब वऱ्हाडे शिक्षण संस्थेद्वारा संचालित वलगांव येथे गाडगे महाराजांच्या निर्वाण भूमीवर त्यांच्याच दहा कलमी कार्यक्रमाने प्रेरित होऊन संत गाडगे महाराज महाविद्यालय १९९१-९२ या सत्रात सुरू केले. प्रथम कला व वाणिज्य हे वर्ग सुरू केले असून १९९२-९३ या सत्रात द्वितीय वर्ष कला व वाणिज्य हे वर्ग सुरू झालेत. सत्र १९९३-९४ या वर्षात तृतीय वर्ष कला व वाणिज्य हे वर्ग सुरू झालेत.

**अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट्ये :**

१) ग्रामीण पार्श्वभूमीवर ग्रामीण युवकास उच्च शिक्षणाची संधी प्राप्त करून देऊन ग्रामीण समाज व जीवन पद्धती विषयी त्यांच्या मनात आस्था निर्माण करणे

२) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास साधणे.

३) विद्यार्थ्यांत राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक जाणीव निर्माण करणे, त्यांच्या सुप्त गुणांचा विकास करणे.

### सन २०२०-२०२१ या सत्रातील अभ्यासक्रम

शिक्षणाचे माध्यम -मराठी

| | | Subject Code |
|---|---|---|
| **बी.ए. भाग १** (Semester I, Semester II) | | |
| **विभाग १ :** | १) इंग्रजी (आवश्यक) | 1001 |
| | २) मराठी (आवश्यक) | 1011 |
| | पुढील पैकी कोणतेही तीन विषय (ऐच्छिक) | |
| **विभाग २ :** | १) अर्थशास्त्र | 1022 |
| | २) राज्यशास्त्र | 1025 |

३) समाजशास्त्र 1024

४) मराठी वाङ्मय 1052

५) इतिहास 1021

६) गृहअर्थशास्त्र 1113

सूचना -विद्यार्थ्यांनी विभाग २ मधील एकदा घेतलेले विषय बी.ए. अंतिम वर्षापर्यंत बदलता येणार नाही.

**बी.ए.भाग २ –** (Semester III, Semester IV)

१) इंग्रजी (आवश्यक) २) मराठी (आवश्यक)

३) पर्यावरणशास्त्र आणि प्रथम वर्षात घेतलेले विषय

**बी.ए.भाग ३ –** (Semester V, Semester VI)

१) इंग्रजी (आवश्यक)

२) मराठी (आवश्यक)

आणि द्वितीय वर्षात घेतलेले विषय

---

| **बी.कॉम.भाग १** | **(Semester I)** | **Subject Code** |
|---|---|---|
| | १) इंग्रजी (आवश्यक) | 1001 |
| | २) मराठी (आवश्यक) | 1011 |
| | 3) PEC | 3011 |
| | 4) AAC | 3012 |
| | 5) PBO | 3013 |
| | 6) CFO | 3014 |
| | **(Semester II)** | |
| | १) इंग्रजी (आवश्यक) | 1001 |
| | २) मराठी (आवश्यक) | 1011 |
| | ३) Business Economics (BEC) | 3021 |
| | ४) Principle of Business Management (PBM) | 3023 |
| | ५) Financial Accounting (FAC) | 3022 |
| | ६)Computer Fundamentals and Operating System(CFS) | 3024 |



**आर्थिक सवलत - शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) :**

अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय, विशेष मागासवर्ग विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध असलेल्या भारत सरकारच्या शिष्यवृत्त्या मिळविता येतात. (अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन, ऑफलाईन अर्ज भरून कार्यालयात आणून द्यावा.)

**शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना सूचना :**

१) शिष्यवृत्ती अगर इतर सवलतधारक विद्यार्थ्यांना प्रत्येक तासिकेला ८०% उपस्थिती आवश्यक आहे.

*शिष्यवृत्ती अर्जासोबत पुढील प्रमाणपत्र /दाखले जोडणे आवश्यक आहे.*

१) शाळा/महाविद्यालय सोडल्याचा (टी.सी.) दाखल्याची व मूळ गुणपत्रिकेची सत्यप्रती .

२) जातीच्या दाखल्याची सत्यप्रत.

३) पूर्वीच्या शाळेचा शिष्यवृत्ती आदेश क्रमांक प्राचार्यांच्या सही-शिक्यानिशी जोडावा.

४) १२ वी ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर खंड असल्यास खंड प्रमाणपत्र जोडावे.

५) उत्पन्नाचा दाखला (तहसिलदाराचा)

६) १ पासपोर्ट फोटो (नुकतेच काढलेले असावे)

७) डुप्लीकेट टि.सी. वर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना कोणतीही शिष्यवृत्ती अगर इतर सवलत मिळणार नाही.

८) प्रत्येक शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी नजीकच्या राष्ट्रीयकृत कोअर बँक सेवा असलेल्या बँकेत स्वत:च्या नावाचे खाते असणे आवश्यक आहे. त्यांनी खाते क्रमांक ची नोंद कार्यालयात करावी.

९) ऑनलाईन, ऑफलाईन अर्जावर आधार कार्ड नंबर टाकावा.

१०) अपूर्ण कागदपत्र असलेले शिष्यवृत्ती अर्ज नामंजूर झाल्यास विद्यार्थी जबाबदार राहील.

१७) शारीरिक क्षमता चाचणीला विद्यापीठ नियमानुसार उपस्थित असणे आवश्यक आहे. अनुपस्थितीबद्दल २५ रू. दंड आकारण्यात येईल.

१८) इ.बी.सी. कागदपत्र अर्जासोबत किंवा प्रवेशानंतर ३१ जुलै पुर्वी सादर करावेत.

१९) इतर शुल्क - पूर्ण भरण्याऱ्या विद्यार्थ्याला प्रवेश घेतेसमयी संपूर्ण शुल्क भरावे लागेल तसेच इ.बी.सी. व शिष्यवृत्ती धारकांना इतर सवलती धारकांना इतर शुल्क (जे सरकारकडून मिळणार नाही ते) प्रवेश घेते समयी भरावे लागेल. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व्यतिरिक्त इतर विद्यापीठातील असल्यास प्रवेश घेतांना १५५ मायग्रेशन फी भरावी लागेल व प्रवेश मिळताच स्थानांतर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे लागेल.

२०) विद्यार्थ्याला काही अडचण झाल्यास त्यांनी प्रथम लिपीक व नंतर प्राचार्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधून आपली अडचण सोडवून घ्यावी.

२१) महाविद्यालयीन वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला शारीरिक शिक्षण अनिवार्य आहे.

२२) विद्यापीठाने वेळोवेळी पाठविलेली माहिती व नियम या माहिती पत्रकात दिलेली आहे. नविन येणारी माहिती सूचना फलकाद्वारा वेळोवेळी कळविण्यात येईल.

२३) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे नियम संबंधित परिक्षार्थी व प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

२४) महाविद्यालयाच्या अंतर्गत होणाऱ्या परीक्षेला गैरहजर राहिल्यास दंड आकारण्यात येईल.

प्रवेश अर्जात नमूद केलेला पालकाचा व्यवसाय व उत्पन्न व फी माफीच्या अर्जात रकाना ७ मध्ये नमूद केलेला व्यवसाय व उत्पन्न सारखे असावयास पाहिजे. फी माफीचा अर्ज भरतांना प्रवेश घेतल्याची पावती असणे आवश्यक आहे. त्या पावतीवरच फी माफीचा अर्ज मिळाल्याची संबंधित लिपीक पोच देईल.



| **बी.कॉम.भाग- २ (Semester III)** | **(Semester IV)** |
|---|---|
| 1) English (1001) | 1) English (1001) |
| 2) Marathi (1011) | 2) Marathi (1011) |
| 3) Company Accounts (3031) | 3) Corporate A/c (3041) |
| 4) Business Mathematics (3032) | 4) Business Statistics(3042) |
| 5) Auditing (3033) | 5) Income Tax (3043) |
| 6) Monitory System (3034) | 6) Indian Financial System(3044) |
| 7) Information Technology & Business Data Process (3035) | 7) Information Technology and Business Data Processing (3045) |

| **बी.कॉम.भाग- ३ (Semester V)** | **(Semester VI)** |
|---|---|
| 1) English (1001) | 1) English (1001) |
| 2) Marathi (1011) | 2) Marathi (1011) |
| 3) Cost Accounting (3051) | 3) Management Accounting(3061) |
| 4) Business Environment (3052) | 4) Eco. of Development(3062) |
| 5) Business Regulatory Frame work(3053) | 5) Company Law(3063) |
| 6) Internet and World Wide Web-I(3058) | 6) Internet and WWW-II(3068) |
| 7) E-Commerce-I(3059) | 7) E-Commerce - II(3069) |

---

| **एम.कॉम.(Semester I)** | **(Semester II)** |
|---|---|
| 1) Managerial Economics | 1. Accounting for Managerial Decisions |
| 2. Services Marketing and Customer Relationship Management | 2. Strategic Management |
| 3. Advanced Financial and Cost Accounting | 3. Management Concept & Organizational Behaviour |
| 4. Banking and Insurance Services | 4.Computer Applications in Business |

एम.कॉम.**(Semester I)** या वर्गात प्रवेश घेण्याकरिता बी.कॉम. ची पदवी असणे अनिवार्य आहे.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक मार्फत महाविद्यालयामध्ये खालील अभ्यासक्रम सत्र २०२०-२१ पासून सुरू होत आहे. (केंद्र क्रमांक १२२२५)**

**१) पूर्वतयारी शिक्षणक्रम**

**पात्रता :** इयत्ता ८,९ व १० पास/नापास

**२) बी.ए. प्रथम वर्ष व बी.कॉम. प्रथम वर्ष**

**पात्रता :**१) पूर्व तयारी शिक्षणक्रम पास

२) १२ वी कला, वाणिज्य व विज्ञान वर्गाची परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण

**टिप :** सत्र २०२०-२१ ला बी.ए./बी.कॉम.(**Semester III, V**) प्रवेशाकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे निर्देश क्रमांक १२/२०२० दिनांक ४ ऑगष्ट २०२० नुसार प्रवेश निश्चित केले जातील.

**सत्र २०१७-१८ पासून बी.ए. भाग १, भाग २ व भाग ३ तसेच बी.कॉम. भाग १, भाग २ व भाग ३ ला विद्यापीठाकडून सेमीस्टर पॅटर्न लागू झालेले आहे. करिता विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी. ते सर्वांना बंधनकारक राहील. हे महाविद्यालय संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नीत असून बी.ए.आणि बी.कॉम ह्या पदव्या अमरावती विद्यापीठाकडून देण्यात येईल.**

**१) बी.ए.भाग १** - या वर्गात १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान या वर्गाची परीक्षा
. - किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण

**२) बी.ए.भाग २** - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ किंवा बी.ए. भाग १
- किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण

**३) बी.ए.भाग ३** - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ किंवा बी.ए. भाग २
- किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण

**४) बी.कॉम.भाग १**- या वर्गात १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान यावर्गाची परीक्षा
. - किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण



८) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याने कोणत्याही कारणाने महाविद्यालयात येणे बंद केल्यास किंवा महाविद्यालय सोडल्यास पूर्ण वर्षाचे शुल्क भरावे लागेल. त्याशिवाय विद्यार्थ्यांला कोणतेही प्रमाणपत्र मिळणार नाही.

९) इ.बी.सी. अर्ज विद्यार्थ्यांना ऑनलाईन भरून त्याची पावती, टी.सी. गुणपत्रिका झेरॉक्स, आणि उत्पन्नाचा दाखला ओरिजनल पावती जोडून कार्यालयात जमा करावी अन्यथा पूर्ण फी भरावी लागेल.

१०) पूर्व सूचनेशिवाय विद्यार्थी वर्गात गैरहजर असल्यास प्रत्येक विषयाच्या तासास नियमानुसार दंड आकारण्यात येईल. ८०% हजर नसल्यास प्रवेश रद्द केला जाईल.

११) प्रजासत्ताक दिन (दि.२६ जानेवारी), स्वातंत्र्य दिन (दि.१५ ऑगस्ट) रोजी सर्वच विद्यार्थ्यांना उपस्थित राहणे अनिवार्य राहील. अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति दिवशी १०० रू दंड आकारण्यात येईल.

१२) विद्यार्थ्यांने आपला प्रवेश अर्ज किंवा इतर कोणताही अर्ज स्वत: अथवा आपल्या पालकाकडून दाखल करावा अन्यथा प्रवेश मिळणार नाही.

१३) विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवेश घेण्याची अंतिम तारीख म्हणून जाहीर केलेल्या तारखेनंतर प्रवेश मिळणार नाही.

१४) प्रवेश अर्जात स्वत:च्या फोटोसहीत आवश्यक ती माहिती काळजीपूर्वक भरावी अन्यथा अर्ज नामंजूर होण्याची शक्यता आहे. फोटोशिवाय आलेला अर्ज स्विकारल्या जाणार नाही.

१५) निरनिराळ्या वेळी महाविद्यालयातर्फे आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहणे आवश्यक आहे.

१६) महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या व आपणास आवडेल त्या खेळात भाग घ्यावा.

## - विद्यार्थ्यांना विशेष महत्वाच्या सूचना -

१) महाविद्यालयात प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना आवश्यक शुल्क भरावे लागेल. विविध सवलती प्राप्त विद्यार्थ्यांना फॉर्ममध्ये मुदतीच्या आत सवलत अर्ज आवश्यक कागदपत्रासहित महाविद्यालयाच्या कार्यालयात सादर करावा. विद्यार्थ्यांना हा सवलत अर्ज कार्यालयात दाखल करताना संबंधित लिपीकाकडून तो प्राप्त झाल्याची पोच आग्रहपूर्वक मागून घेऊन स्वत:जवळ ती काळजीपूर्वक ठेवावी.

२) प्रवेश अर्जासोबत सर्टिफिकेटच्या सत्यलिपी जोडाव्यात परंतु शाळा किंवा महाविद्यालय सोडल्याचा दाखल्याची मूळ प्रत (ओरिजनल टी.सी.) प्रवेश घेते वेळी द्यावी लागेल.

३) डुप्लीकेट टी.सी.वर प्रवेश मिळणार नाही, कुठलाही परिस्थितीत यांची कटाक्षाने नोंद घ्यावी.

४) प्रत्येक विद्यार्थ्यांने १) प्रवेश अर्ज २) इ.बी.सी. अर्ज ३) शिष्यवृत्तीचे अर्ज ४) विद्यापीठ परिक्षेची आवेदन पत्र ५) विद्यार्थी फंड इ. कागदपत्र कार्यालयात सादर करताच संबंधित लिपीकाकडून छापील फार्मवरील त्याचे सही अर्ज मिळाल्याबद्दल पावती घ्यावी व सांभाळून ठेवावी.

५) वार्षिक शुल्क नामांकन शुल्क व इतर शुल्कामध्ये काही बदल झाल्यास तशी सूचना कार्यालयाच्या वार्तफलकावर वेळोवेळी लावण्यात येईल व त्यानुसार विद्यार्थ्यांना शुल्क भरावे लागेल. नामांकन अर्ज विद्यार्थ्याने स्वहस्ताक्षरात भरावा.

६) महाविद्यालयाचे परिसरात धुम्रपान करणे, गुटखा किंवा अंमली पदार्थ सेवन, कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन करणे दंडनिय अपराध आहे.

७) मोबाईल वा अन्य मौल्यवान वस्तु हरविल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.



**५) बी.कॉम.भाग२** -संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ किंवा बी.कॉम.भाग १ - किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण

**६) बी.कॉम.भाग३**- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ किंवा बी.कॉम भाग २ - किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण

### सत्र : २०२०-२०२१

**प्रवेश अर्ज :**

१) ह्या अभ्यासक्रमाकरिता महाविद्यालयाने निश्चित केलेल्या अर्जाच्या नमुन्यावर उमेदवाराने आपल्या हस्ताक्षरात सर्व माहिती भरून द्यावी.

२) प्रवेश अर्ज मंजूर होताच बाकीचे शुल्क (फी) माहिती पत्रकात नमूद केल्याप्रमाणे ताबडतोब भरावे लागेल.

३) विद्यार्थ्यांला प्रवेश दिल्यावर कोणतीही फी परत मिळणार नाही.

४) प्रवेश अर्जासोबत पुढील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

अ) महाविद्यालयाच्या प्रमुखाची स्वाक्षरी असलेली, ती संस्था सोडल्याबद्दलच्या दाखल्याची मूळप्रत (टी.सी.) व दोन सत्य प्रती.

ब) वर्ग १२ वीच्या परीक्षेची मूळ गुणपत्रिका (मार्कलिस्ट) व दोन सत्य प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे.

क) ज्या विद्यार्थ्यांच्या आई, वडील किंवा पालक यांचे वार्षिक उत्पन्न १,००,००० रू. किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांनी ई.बी.सी. कन्सेशनचा फॉर्म योग्य माहितीसह तहसिलदार यांच्याकडून उत्पन्नाचा दाखला घेऊन ह्या आवेदन पत्रासोबत जोडावा अन्यथा फी माफीची सवलत मिळणार नाही.

ड) अनुसूचित जाती जमाती विमुक्त जाती व भटक्या जमाती व इतर मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना जातीचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

ई) अर्जावर पासपोर्ट फोटो जोडणे आवश्यक राहील.

फ) शिक्षणात खंड पडलेल्या विद्यार्थ्याने त्याबद्दलचा दाखला (गॅप सर्टीफिकेट) देणे आवश्यक राहील.

# वार्षिक शुल्क

| | | |
|---|---|---|
| 1. | Annual University Fee | 70=00 |
| 2. | Corpus Fund | 05=00 |
| 3. | Student Welfare Fund | 10=00 |
| 4. | Student Council Fee | 05=00 |
| 5. | Student Safety Insurance fee | 10=00 |
| 6. | Emergency Fund | 10=00 |
| 7. | Games and Sports Fee | 135=00 |
| 8. | I.U.S. Meet Sports Fee | 30=00 |
| 9. | Enrolment Fee | 100=00 |
| 10. | Gadge Baba Adhyasan Fee | 05=00 |
| 11. | Library Fee | 135=00 |
| 12. | Extra Curricular Activities | 70=00 |
| 13. | Medical Exam Fee | 45=00 |
| 14. | Physical Efficiency Test Fee | 25=00 |
| 15. | Student Aid Fund | 25=00 |
| 16. | College Magazine Fee | 70=00 |
| 17. | Identity Card | 30=00 |
| 18. | Laboratory fee (HEC/Computer) | 405=00 |
| 19. | Environment Fee (BAII/B.Com.II) | 135=00 |
| 20. | Facilities Fee | 70=00 |
| 21. | Security fee | 50=00 |
| 22. | Vehicle Stand | 50=00 |
| 23. | College Exam Fee | 100=00 |
| 24. | Tution Fee | 800=00 |
| 25. | Prospectus | 20=00 |

शिक्षण शुल्क :

शिक्षण शुल्क पूर्ण सत्राकरिता ८०० रू. भरावे लागतील. प्रवेश घेते वेळी सर्व फी द्यावी लागेल.



## FEE TO BE PRESCRIBED FOR M.COM.

| | | |
|---|---|---|
| 1) | Tuition Fee | 3000=00 |
| 2) | Prospectus and Admission Form | 20=00 |
| 3) | Laboratory Fee | 2665=00 |
| 4) | Library Fee | 1330=00 |
| 5) | Facilities Fee | 805=00 |
| 6) | Identity Card | 30=00 |
| 7) | College Examinations | 100=00 |
| 8) | Vehicle Stand | 50=00 |
| 9) | Security fee | 50=00 |

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक शुल्क विवरण :**

**शिक्षणक्रम शुल्क ( प्रथम वर्ष बी.ए.)**

| | |
|---|---|
| विद्यापीठ शुल्क | रू. ११००=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क | रू. ५००=०० |
| एकूण शुल्क | रू. १६००=०० |

**विद्यापीठ शुल्काचा तपशील :**

| अ.क्र. | शुल्काचे शीर्षक | शुल्क (रू.) |
|---|---|---|
| १. | नोंदणी शुल्क | ५००=०० |
| २. | शैक्षणिक शुल्क | २५०=०० |
| ३. | परीक्षा शुल्क | ३००=०० |
| ४. | संकीर्ण | २००=०० |
| ५. | विकास निधी | २५०=०० |
| | एकूण शुल्क (रू.) | ११००=०० |